प्रकरण एक

# प्रास्ताविक

१.१ संशोधन समस्येची पार्श्वभूमी

१.२ संशोधन समस्येचे शब्दांकन

१.३ संशोधन समस्येचे महत्व

१.४ संशोधनाची उद्दिष्टे

१.५ संशोधनविषयाशी संबंधित साहित्याचे समालोचन

१.६ संशोधनाची व्याप्ती व मर्यादा

१.७ संशोधनाची पध्दती व साधने

१.८ प्रकरणीकरण

संदर्भ सूची

## प्रकरण एक

## प्रास्ताविक

### १.१] संशोधन समस्येची पार्श्वभूमी -

मातृभाषा मुलाला जीवनरस पुरविते. त्या जीवनरसानेच त्याचे व्यक्तित्व उमलते, फुलते, बहरते. म्हणूनच कै. प्रा.ग.वि. अकोलकर म्हणतात, "व्यक्तित्वाच्या वेलीवर उमलणाऱ्या सुंदर सुमनांना मातृभाषा हाच जीवनरस आहे." [१] कवी कोलरिज म्हणतात, "Mothertongue is the language of heart." 'मातृभाषा ही ह्रदयाची भाषा आहे.'[२] जे मूल आईच्या मुखातून बाहेर पडणाऱ्या शब्दातून जीवनाचा पहिला पाठ शिकते त्याच्यावर परकीय भाषा लादणे पाप होय असे गांधीजींचे स्पष्ट मत होते.[३]

मराठी ही महाराष्ट्राची राजभाषा तसेच या राज्यात राहणाऱ्या बहुसंख्य लोकांची मातृभाषा आहे. म्हणून मातृभाषा हे शिक्षणाचे सुयोग्य माध्यम आहे. मातृभाषेतून शिक्षण द्यावे असा आग्रह धरला जातो पण प्रत्यक्ष परिस्थिती मात्र वेगळी आहे.

महाराष्ट्र राज्याची निर्मिती होऊन आता पस्तीस वर्षे झाली आहेत. कागदोपत्री मराठी ही महाराष्ट्राची राज्यभाषा झाली आहे. शासकीय व अशासकीय कार्यालये आणि अन्य संस्था यांचा कारभार मराठी भाषेतून व्हावा या संबंधीचे आदेश, ठराव व घोषणा अनेकदा झाल्या आहेत. परंतु त्यांची अंमलबजावणी व्हावी तेवढी झालेली दिसत नाही. अजूनही शासनाचे बहुसंख्य आदेश इंग्रजीतून येतात. इंग्रज राज्यकर्ते जाऊन बरीच वर्षे झाली तरी इंग्रजी भाषेचे आकर्षण अद्यापही कायम आहे. अनेक विषयातील नवनवीन विचारप्रवाह हे पाश्चात्य देशामधूनच आपल्याकडे आल्यामुळे त्यांच्या सखोल अभ्यासासाठी इंग्रजी वाङ्मयाचा वेळोवेळी उपयोग करून घ्यावा लागतो. विष्णूशास्त्री चिपळूणकरांनी म्हटल्याप्रमाणे इंग्रजी भाषा म्हणजे 'वाघिणीचे दूध' आहे. ती जगाकडे पाहण्याची 'खिडकी' आहे. उच्च-

शिक्षण, विद्यापीठीय स्तरावरील शिक्षण, तंत्र, अभियांत्रिकी, वैद्यकीय व्यवसायाचे शिक्षण आजही इंग्रजी माध्यमातून दिले जाते. मराठीतून पाठ्यपुस्तके, संदर्भ पुस्तके उपलब्ध नसल्याने लोकांचा ओढा इंग्रजी माध्यमाकडे असल्याचे दिसून येते.

जीवन व शिक्षण या दोन्ही क्षेत्रात मातृभाषेचे महत्व असाधारण आहे. मातृभाषेतून केलेले अध्ययन व अध्यापन सहजसुलभ असल्याने ज्ञानग्रहण करणे सोपे जाते त्यामुळे अध्यापनाचे माध्यम मातृभाषा असणे हे नैसर्गिक आहे. 'मराठी' माध्यमाचा सर्वत्र प्रसार असतानाही मुलांना किंबहुना पालकांना इंग्रजी भाषेचे अलिकडे फारच आकर्षण वाटत आहे.

शहरातून, मोठ्या गावातून कांही प्रमाणात ग्रामीण भागातूनही इंग्रजी माध्यमाच्या शाळा अगदी पूर्व-प्राथमिकपासून सर्व स्तरावर काढण्याचा सपाटा चालू आहे. इतक्या बालवयात सगळे विषय इंग्रजीतून शिकणे मानसशास्त्रीयदृष्ट्या योग्य आहे की नाही ? याचा विचारही पालक करीत नाहीत. याउलट आपला मुलगा इंग्रजीतून शिकतो व कॉन्व्हेन्टमध्ये जातो याचाच पालकांना अभिमान वाटतो. याचा परिणाम म्हणूनच मराठी भाषेकडे पाहण्याचा दृष्टिकोन उपेक्षेचा दिसून येतो. मराठी भाषेची गळचेपी होऊन तिची पिछेहाट झाल्याचे दृश्य दिसते. एके ठिकाणी कुसुमाग्रजांनी असे म्हटले आहे की, "मराठी भाषेला राज्यभाषेचा दर्जा असला तरी तिचा राज्यकारभारात जेवढा वापर व्हावा तेवढा होत नाही. तिच्या डोक्यावर सोनेरी मुकुट असला तरी तिची वस्त्रे फाटलेली आहेत."[4] यावरून मराठी भाषेची झालेली अवस्था लक्षात येते.

' मराठी माध्यमाच्या शाळेतून प्रथम भाषा म्हणून स्थान असूनही मराठी भाषेच्या अध्ययन-अध्यापनामध्ये उदासिनता दिसून येते. अनेक समस्या निर्माण होत आहेत. आज मराठी विषयाच्या पदवीधरांनाही सरळ, सुवाच्च व शुध्द भाषेत मराठीमध्ये चार ओळी लिहिता येत नाहीत अशी जाणकारांची तक्रार आहे. प्रथम भाषा म्हणून शिकणा-यांच्या बाबतीत जर

असे घडत असेल तर इंग्रजी माध्यमाच्या शाळेतून जेथे द्वितीय भाषा म्हणून मराठीचे अध्ययन-अध्यापन केले जाते तेथे नेमकी काय अवस्था असेल ? असा प्रश्न पडतो. अध्ययन-अध्यापन करताना कोणत्या समस्या, अडचणी येत असतील ? हा प्रश्न चिंतनाचा व चिंतेचा बनला आहे. याचा शोध घेऊन त्याची कारणमीमांसा शोधणे, त्यावर उपाययोजना करणे हे अगत्याचे वाटल्यामुळे या विषयाची संशोधनासाठी निवड करावी असे संशोधिकेस वाटले.

संशोधिका मराठी विषयातील पदव्युत्तर परीक्षा उत्तीर्ण असून गेली नऊ वर्षे ती शिक्षणशास्त्र महाविद्यालयात 'मराठी अध्यापन पध्दती' या विषयाचे अध्यापन करते. त्यामुळे या विषयाच्या अध्ययन-अध्यापनात येणाऱ्या समस्या सोडविणे हा तिच्या जिव्हाळ्याचा विषय असल्याने हा विषय संशोधनासाठी निवडण्याचे निश्चित ठरविले.

सराव-पाठ निरीक्षणाच्या निमित्ताने तिला अनेक मराठी माध्यमाच्या माध्यमिक शाळेमध्ये जाण्याची संधी मिळाली त्यावेळी असे निदर्शनास आले की, मराठी अध्यापनाची सर्व उद्दिष्टे साध्य होत नाहीत. काही शाळातून अध्यापनाच्या विषय-विशेष सोयी व साधने उपलब्ध नाहीत. विद्यार्थी अध्ययन-अध्यापनाकडे दुर्लक्ष करतात. मराठी माध्यमाच्या शाळातून जर अशी स्थिती असेल तर इंग्रजी माध्यमाच्या शाळातून मराठी विषयाच्या अध्ययन-अध्यापनाची काय अवस्था असेल अशी समस्या तीव्रतेने संशोधिकेसमोर निर्माण झाली. त्यामागील कारणांचा शोध घेवून ही स्थिती सुधारण्यासाठी कांही उपाय शोधून काढावेत या विचाराने संशोधिकेने सदर विषयाची निवड केली.

इंग्रजी माध्यमाच्या शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांशी जेव्हा संशोधिकेचा संपर्क आला तेव्हा त्यांना मराठी विषयाच्या अध्यापनाबाबत व आकलनाबाबत अडचणी असल्याचे निदर्शनास आले. या विद्यार्थ्यांना मराठी विषयाचा अभ्यास करण्यासाठी शाळेव्यतिरिक्त मार्गदर्शनाची गरज वाटते. इतकेच

नव्हे तर इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थ्यांना इतर विषयाच्या तुलनेने मराठी विषयात कमी गुण मिळतात. इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील विषयवार निकालाचे निरीक्षण केल्यास मराठी विषयाचा निकाल तुलनेने कमी आढळतो. या सर्व प्रश्नामागे असणाऱ्या कारणांचा शोध घेण्याच्या हेतूने व त्या समस्या दूर करण्यासाठी कांही उपाय शोधण्याच्या उद्देशाने सदर विषयाची निवड करण्याचे निश्चित केले.

संशोधिकेस असलेली मराठी विषयाबाबत अभिरुची, मराठी विषया-संदर्भात येणाऱ्या समस्या जाणून घेण्याची जिज्ञासा, आणि त्या समस्यांचे निराकरण करु शकणारी उपाययोजना शोधण्याची तीव्र इच्छा ही सुध्दा हा विषय संशोधनासाठी निवडण्यापाठीमागे असणारी प्रमुख प्रेरणा आहे.

१.२] <u>समस्येचे शब्दांकन</u> :-


"मिरज तालुक्यातील इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक शाळांमध्ये शिकविल्या जाणाऱ्या मराठी भाषेच्या अध्ययन-अध्यापनामध्ये येणाऱ्या समस्यांचा चिकित्सक अभ्यास."

संशोधन हे एक शास्त्रीय कार्य आहे. कोणत्याही विषयाचा शास्त्रशुध्द अभ्यास करताना संज्ञा एका विशिष्ट अर्थानेच वापराव्या लागतात. त्यासाठी संशोधन विषय अधिक स्पष्ट व्हावा या हेतूने संशोधन समस्येच्या वरील विधानात वापरलेल्या महत्वाच्या शब्दांच्या व्याख्या व स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे आहे.

<u>मिरज तालुका</u> -

मिरज हा एक सांगली जिल्ह्यातील तालुका आहे. या तालुक्यात ७१ गावे समाविष्ट केलेली आहेत. येथील लोकसंख्या सुमारे ५,०६,३२० इतकी आहे. या तालुक्यात मराठी माध्यमाच्या माध्यमिक शाळा ९२ आहेत तर इंग्रजी माध्यमाच्या ८ शाळा आहेत.

सांगली जिल्ह्यातील मिरज तालुका दाखविणारा नकाशा



मिरज तालुक्यातील इंग्रजी माध्यमाच्या शाळा दाखविणारा नकाशा




१] न्यू इंग्लिश स्कूल, मिरज

२] प्रोग्रेसिव्ह इंग्लिश स्कूल, मिरज

३] आयडियल इंग्लिश स्कूल, मिरज

४] न्यू ॲपॉस्टालिक इंग्लिश स्कूल, मिरज

५] मॉडर्न इंग्लिश स्कूल, सांगली

६] इमॅन्युअल इंग्लिश स्कूल, सांगली

७] मार्टिन्स इंग्लिश स्कूल, सांगली

८] शांतीदेवी शिंदे म्हैसाळकर इंग्लिश स्कूल, म्हैसाळ.

इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक शाळा -

मिरज तालुक्यातील ज्या माध्यमिक शाळांमध्ये मराठी, हिन्दी व संस्कृत या भाषा विषयाखेरीज सर्व विषय इंग्रजी भाषेमधून शिकविले जातात त्यांना इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक शाळा असे संबोधिले आहे.

मराठी -

मराठी हा विषय तीन स्तरावर शिकविला जातो. मराठी माध्यमाच्या शाळातून प्रथम स्तरावर, इंग्रजी माध्यमाच्या शाळातून द्वितीय स्तरावर व जेथे मराठी व्यतिरिक्त भाषा द्वितीय स्तरावर असते त्या ठिकाणी ती तृतीय स्तरावर शिकविली जाते. येथे द्वितीय स्तरावर शिकविली जाणारी मराठी भाषा या अर्थाने शब्दप्रयोग केलेला आहे.

अध्ययन -

मराठी द्वितीय भाषा म्हणून विद्यार्थी अभ्यास करताना व शिकत असताना या अर्थी अध्ययन हा शब्द वापरला आहे.

अध्यापन -

विद्यार्थ्यांना अध्ययन-अनुभव देण्यासाठी आयोजित केलेल्या उपक्रमांना कार्यवाहीत आणणे म्हणजे अध्यापन. येथे मराठी द्वितीय भाषा म्हणून शिकवित असताना या अर्थी अध्यापन हा शब्द वापरला आहे.

समस्या -

हा शब्द अडचणी या अर्थाने वापरला आहे.

चिकित्सक अभ्यास -

चिकित्सक अभ्यास म्हणजे सूक्ष्म, सांगोपांग, सारासार सर्वांगिण विचार करुन, तपशीलवार, समीक्षणात्मक असा अभ्यास की ज्यामध्ये इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक शाळेत मराठी या द्वितीय भाषेच्या अध्ययन-अध्यापनात येणाऱ्या समस्येची कारणे शोधून त्यावर उपाययोजना शोधणे.

१.३] संशोधन समस्येचे महत्व :-

महाराष्ट्रात १९६० पासून मराठी भाषेला लोकशाही शासनप्रणालीशी सुसंगत असे रूप देण्याचे शास्त्रशुध्द प्रयत्न करण्यात आले आहेत. परंतु आजही सर्वत्र मराठीकरण झालेले दिसून येत नाही. महाराष्ट्र शासनाने अलिकडेच नव्याने एक चांगला निर्णय मराठी भाषेच्या संदर्भात घेतलेला आहे, तो म्हणजे बिगर मराठी विद्यार्थ्यांना इयत्ता ८ वी पासून इयत्ता १० वी पर्यन्त मराठी भाषेचे अध्ययन करावेच लागेल. मराठी ही तर महाराष्ट्राची राजभाषा. परंतु या महाराष्ट्रात राहूनही बिगर मराठी विद्यार्थी मराठी भाषेशी, जीवनाशी, संस्कृतीशी समरस होत नाहीत. महाराष्ट्रात राहूनही ते अमराठीच राहत असत. पण आता त्यांना सक्तीने मराठी शिकावेच लागेल. परंतु एवढयानेच मराठी भाषा व संस्कृती हिचे संवर्धन होईल असे मात्र म्हणता येणार नाही.

सर्व शिक्षणतज्ज्ञांनी व मानसशास्त्रज्ञांनी मातृभाषेचे महत्व मान्य करून तिच्या सामर्थ्यावर व्यक्ती कोणत्याही विषयाच्या अभ्यासासाठी लागणारी आकलनशक्ती व कौशल्ये यांचा विकास करून घेऊन प्रगती करू शकते, असे प्रतिपादन केले आहे. मातृभाषा हे शिक्षणाचे सुयोग्य व प्रभावी माध्यम आहे याबाबत कोणाचेही दुमत नाही. मात्र या भाषेच्या अध्ययन-अध्यापनात अनेक अडचणी आहेत. विशेषत: इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये या समस्या विशेषत्वाने जाणवतात म्हणून संशोधिकेने या अडचणींचा शोध घेऊन त्यावर उपाययोजना शोधण्याचे महत्वपूर्ण काम या शोधप्रबंधाद्वारे हाती घेतले आहे.

वरील विषयाच्या संदर्भात संशोधन करताना विद्यार्थी अध्ययन, शिक्षक अध्यापन, अध्ययन-अध्यापन यांच्याशी निगडीत असणाऱ्या सर्व घटकांचा अभ्यास, अभ्यासपूरक कार्यक्रम, विविध साधने, अध्यापन पध्दती इत्यादिंचा भाषेच्या गद्य, पद्य, व्याकरण, लेखन या विविध अंगोपांगातून अभ्यास करणार आहे. त्यामुळे या विषयास वास्तवतेचा आधार प्राप्त होईल.

संशोधिका सदरच्या प्रबंधात अध्यापकांच्याबाबतीत कमी वेळ, विस्तृत विषय, अभ्यासक्रम, माध्यमाच्या अडचणी, विद्यार्थ्यांच्या अध्ययनातील कच्चे दुवे, आकलनातील अडथळे, पाठ्यपुस्तके, पध्दती, हस्तपुस्तिका, शैक्षणिक साधने, परीक्षा पध्दती, हस्ताक्षर, स्वाध्याय, अभ्यासेतर उपक्रम इत्यादी संदर्भात येणा-या समस्यांचाही विचार करणार आहे. विशेषत: इंग्रजी माध्यमामुळे मराठी भाषेच्या अध्ययन-अध्यापनातील समस्यांचा साकल्याने विचार होणार असल्याने हे संशोधन दैनंदिन अध्ययन-अध्यापनात येणा-या समस्यांचे निराकरण करण्यास मदत करेल. तसेच इंग्रजी माध्यमांच्या शाळेतील मराठी विषयाच्या निकालाचे इतर विषयाच्या तुलनेने कमी असलेले प्रमाण वाढविण्यासाठी हे संशोधन उपयोगी पडेल.

आजपर्यन्त मराठी माध्यमाच्या शाळेत मराठी विषयाच्या अध्ययन-अध्यापनामध्ये येणा-या विविध समस्येविषयीची संशोधने झालेली आहेत. परंतु इंग्रजी माध्यमाच्या शाळेत येणा-या समस्येविषयी अद्याप संशोधन झालेले नसल्याने हे संशोधन मूलभूत व नाविन्यपूर्ण आहे असे म्हणता येईल. यादृष्टीने या विषयाच्या अध्ययन-अध्यापन समस्या जाणून घेऊन त्या सोडविण्याचा प्रयत्न केल्यास विद्यार्थ्यांचे अध्ययन व शिक्षकांचे अध्यापन परिणामकारक होईल व सदर संशोधन इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थ्यांस व शिक्षकास त्यांच्या कार्यामध्ये, अध्ययन-अध्यापनामध्ये सुधारणा घडवून आणण्याच्या कामी उपयोगी पडेल असे संशोधिकेस वाटते.

अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रमांचे आयोजन व नियोजन करतानाही सदर संशोधन उपयुक्त ठरेल.

१.४] <u>संशोधनाची उद्दिष्टे</u> :-

१] इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थ्यांच्या मराठी भाषेच्या बाबतीत असलेल्या मागासलेपणाची कारणे शोधणे.

२] इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थ्यांना मराठी भाषेच्या अध्ययनामध्ये

येणा-या समस्यांचा शोध घेणे.

३] इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील शिक्षकांना मराठी भाषेचे अध्यापन करताना येणा-या समस्यांचा शोध घेणे.

४] इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थ्यांना मराठी विषयाच्या अध्ययनातील येणा-या समस्यांचे निराकरण करण्यासाठी उपाय सुचविणे.

५] इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील शिक्षकांना मराठी विषयाचे अध्यापन करताना येणा-या समस्यांचे निराकरण करण्यासाठी उपाय सुचविणे.

६] इंग्रजी माध्यमातील विद्यार्थ्यांचा मराठी भाषेचा दर्जा सुधारण्यासाठी विविध उपक्रम व शैक्षणिक साधने सुचविणे.

७] इंग्रजी माध्यमातील विद्यार्थ्यांना मराठी विषयासंबंधी अभिरुची निर्माण करण्यासंबंधी अभ्यासपूरक कार्यक्रम सुचविणे.

## १.५] संशोधन विषयाशी संबंधित साहित्याचे समालोचन :-

उपरोक्त संशोधनविषयाशी संबंधित संशोधनात्मक अभ्यासाचा शोध घेण्यासाठी संशोधिकेने पुढील ग्रंथांचे अवलोकन केले.

i) The Survey of Research in Education. (1964-72)
Editor - M.B. Buch.

ii) The Second Survey of Research in Education (1972-78)
Editor - M.B. Buch

iii) Third Survey of Research in Education (1978-83)
Editor - M.B. Buch

iv) Fourth Survey of Research in Education (1983-88)
Editor - M.B. Buch (Volume I and II)

वरील ग्रंथाव्यतिरिक्त University News यासारख्या नियतकालिकातून Thesis of the month या सदराखाली प्रसिध्द झालेल्या

प्रबंधाची नावे वाचली.

भारतीय शिक्षण, संपादक डॉ. म. बा. कुंडले या नियतकालिकातील संशोधन विषयक अंक वाचले.

या सर्वांचे काळजीपूर्वक अवलोकन केले असता प्रस्तुत संशोधनविषयासारखे संशोधन आढळून आले नाही. यादृष्टीने प्रस्तुत संशोधन मूलभूत आणि नाविन्यपूर्ण आहे असे म्हणता येईल.

परंतु भाषा विषयाच्या संदर्भात झालेल्या व सदर संशोधन विषयाशी थोडयाफार प्रमाणात संबंधित व समांतर असणा-या कांही संशोधनाचा अभ्यास याच प्रकरणात केला आहे. संबंधित संशोधन अहवालाची उद्दिष्टे, कार्यपध्दती निष्कर्ष थोडक्यात दिले आहेत.

1) Misra J.N., 'A Study of Problems and Difficulties of Language Teaching at Secondary Level.'
- Ph.D. Education, Sag. U. 1968.[५]

हा संशोधन प्रकल्प मिश्रा जे. एन्. यांनी सागर विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्रातील पीएच्. डी. या पदवीसाठी १९६८ साली पूर्ण केला.

<u>या शोध अभ्यासाची उद्दिष्टे</u> -

अ] विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासाच्यादृष्टीने भाषेचे महत्व समजून घेणे.

ब] माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या भाषाविषयीच्या मागासलेपणाच्या कारणांचे निदान करणे.

क] प्रत्यक्ष भाषा विषय शिकविताना शिक्षकाला येणा-या अडचणी समजावून घेणे.

ड] विद्यार्थ्यांचा भाषेचा स्तर सुधारण्यासाठी विविध साधने सुचविणे.

<u>संशोधन पध्दती</u> -

या संशोधनासंदर्भात १६३ विभागातून माहिती गोळा करण्यात आली.

१000 शिक्षकांकडून प्रश्नावली भरून घेण्यात आल्या, ५00 शिक्षकांच्या मुलाखती घेण्यात आल्या, १५0 शिक्षकांच्या पाठाचे निरीक्षण केले. यातून मिळालेल्या माहितीचे संकलन, वर्गीकरण करून शेकडेवारीच्या आधारे निष्कर्ष काढण्यात आले.

निष्कर्ष -

अ] गद्य विभाग शिकविताना ६६ % शिक्षकांना अडचणी आल्या.

ब] ५0 % पेक्षा जास्त शिक्षकांनी भाषांतर पध्दती मान्य केली.

क] फक्त २५ % शिक्षक दिग्दर्शन पध्दतीवर विश्वास ठेवतात.

ड] काव्य शिकविणे ६0 % पेक्षा जास्त शिक्षकांना कठीण वाटते.

इ] गद्य, पद्य यातील पाठांतरावर भर द्यावा असे सर्वांना वाटले.

फ] व्याकरण शिकविताना ८५ % शिक्षकांना वेळेची कमतरता वाटली.

ग] निबंधलेखनास वेळ कमी तर वाक्यरचना, योग्य अभिव्यक्ती या अडचणी आल्या.

ह] विद्यार्थ्यांनी शब्दकोषाचा वापर करावा असे २५ % शिक्षकांनी आग्रह धरला.

ज] सर्व शिक्षकांना भाषेचा अभ्यासक्रम जास्त वाटला.

वरील संशोधन पध्दती व संशोधन विषयाशी समांतर असणाऱ्या पुढील संशोधनाचाही संशोधिकेने अभ्यास केला.

2) Patankar K.A. - 'Teaching Marathi as a Regional language to non-marathi speaking pupils studying in Standard III in Anglo Indian and the English teaching schools in the city of Bombay and its neighbourhood a critical study of present plan the course and the book prescribed.' - Ph.D. Edu. - Bom. U. 1964

3) Raina S.N. - 'Teaching Kashmiri to Hindi speakers.'

- Ph.D. Kur. U. 1986.

4) Dulai N.K. - 'Teaching of Punjabi to Hindi speakers'
- Kur. U. 1985

5) Chatterjee S. - 'Teaching Bengali as a second language in Anglo Indian schools in West Bengal Dept. of Comparative Philology and linguistics.'
- Cal.U. 1976 (N.C.E.R.T. financed)

6) Chninnappa P. - 'An Investigation into problems and difficulties in learning Hindi by the Telagu speaking students of class VIII in the high schools of Andhra Pradesh.'
- Ph.D., Edu., MS.U. 1978.

७] सौ. रे.भा.टोपकर - "सांगली शहरातील माध्यमिक स्तरावरील मातृभाषा मराठीच्या अध्ययन-अध्यापनाच्या समस्यांचा चिकित्सक अभ्यास"
- शिवाजी विद्यापीठ, एम.फिल्., मे-१९८९.

१.६] <u>संशोधनाची व्याप्ती व मर्यादा</u> -

हे संशोधन सांगली जिल्ह्यातील मिरज तालुक्यातील इंग्रजी माध्यमाच्या शाळांपुरतेच मर्यादित आहे. अशा शाळा मिरज तालुक्यात आठ आहेत. त्या सर्व शाळा संशोधनासाठी घेतलेल्या आहेत. त्या शाळांची नावे पुढीलप्रमाणे आहेत.

१] न्यू इंग्लिश स्कूल, मिरज.
२] प्रोग्रेसिव्ह इंग्लिश स्कूल, मिरज.
३] आयडियल इंग्लिश स्कूल, मिरज.
४] न्यू ॲपॉस्टालिक इंग्लिश स्कूल, मिरज.
५] मॉडर्न इंग्लिश स्कूल, सांगली.

६] इम्मॅन्युअल इंग्लिश स्कूल, सांगली.

७] मार्टिन्स इंग्लिश स्कूल, सांगली.

८] शांतीदेवी शिंदे म्हैसाळकर इंग्लिश स्कूल, म्हैसाळ.

हे संशोधन इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक शाळेतील केवळ मराठी या विषयाच्या अध्ययन-अध्यापनापुरतेच मर्यादित आहे. सबब या संशोधनात मराठी खेरीज इतर विषयांच्या समस्येचा अभ्यास अभिप्रेत नाही. तसेच अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तक, पध्दती आदिंचा सखोल अभ्यास अपेक्षित नाही.

सदर संशोधन इंग्रजी माध्यमांच्या वर उल्लेखलेल्या शाळेतील नववी व दहावी या वर्गापुरतेच मर्यादित आहे.

या संशोधनाद्वारे इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थ्यांच्या मराठी विषयाच्या अध्ययनाबाबत असणा-या समस्यांचा अभ्यास केलेला आहे, तसेच मराठी विषयाचे अध्यापन करणा-या अध्यापकांच्या समस्यांचाही विचार केला आहे.

१.७] संशोधनाची पध्दती व साधने :-

शैक्षणिक संशोधन म्हणजे अशी कृती की जी शैक्षणिक परिस्थितीमधील वर्तमानशास्त्राच्या प्रगतीच्या दिशेने गतिमान झालेली असते. शास्त्रशुध्द पध्दतीने संशोधन करणे आणि शिक्षणक्षेत्रातील समस्या सोडविणे याच दोन संकल्पना व त्यांचे एकत्रीकरण म्हणजे शैक्षणिक संशोधन होय. [६]

शैक्षणिक संशोधन म्हणजे शिक्षणक्षेत्रातील उद्दिष्टे, अभ्यासक्रम, अध्ययन-अध्यापन पध्दती, मूल्यमापन, विद्यार्थी, शिक्षक, वातावरण, विविध संकल्पना शैक्षणिक साहित्य, तंत्र, पाठ्यपुस्तके इत्यादीपैकी एक वा अनेक शैक्षणिक घटकांच्या संदर्भात निर्माण झालेल्या व होणा-या समस्यांचे शास्त्रशुध्द उत्तर शोधण्याचा करण्यात येणारा प्रयत्न होय. [७]

शैक्षणिक संशोधनाचे तीन विभागात वर्गीकरण केले जाते.

१] भूतकाळाशी संबंधित असणा-या समस्यांचे संशोधन करणा-या पध्दतीस ऐतिहासिक संशोधन म्हणतात.

२] वर्तमानकाळाशी संबंधित असलेल्या समस्यांचे संशोधन करणा-या पध्दतीस वर्णनात्मक संशोधन पध्दती म्हणतात.

३] भविष्यकाळाशी संबंधित असणा-या समस्यांचे संशोधन करणा-या पध्दतीस प्रायोगिक पध्दती म्हणतात.

हे संशोधन वर्तमान परिस्थितीशी निगडीत असल्याने या संशोधनासाठी वर्णनात्मक सर्वेक्षण पध्दतीची निवड करण्यात आलेली आहे, कारण वर्णनात्मक सर्वेक्षण पध्दतीमध्ये मूलभूत स्वरूपाची माहिती जमा केली जाते. यासाठी प्रश्नावली, कसोटया यासारख्या साधनांचा वापर केला जातो. याद्वारे जमा केलेल्या माहितीचे योग्य पध्दतीने सारणीकरण करून अर्थनिर्वचन केले जाते म्हणून प्रस्तुत संशोधनाच्या संदर्भात सद्य:स्थिती कोणती आहे हे जाणून घेण्यासाठी ही पध्दती उपयोगी आहे. या पध्दतीच्या आधारे माहितीचे, सामुग्रीचे संकलन, वर्णन, स्पष्टीकरण व मूल्यांकन केले असून चांगल्या बदलासाठी शिफारशी करण्यात आल्या आहेत.

प्रस्तुत शोधप्रबंधासाठी दोन भागात माहिती गोळा केली, अध्ययना-संबंधीच्या समस्या शोधण्यासाठी विद्यार्थी प्रश्नावली तयार केली व अध्यापना-संबंधीच्या समस्या शोधण्यासाठी अध्यापक प्रश्नावली तयार केली. या दोन्ही प्रश्नावली परिशिष्ट-अ आणि ब मध्ये दिलेल्या आहेत.

वरील प्रश्नावलीद्वारा अध्यापकांकडून गोळा केलेल्या माहितीची सत्यता पडताळून पाहण्यासाठी कांही अध्यापकांशी चर्चा केली, तसेच सर्व शाळांना प्रत्यक्ष भेटी देऊन तत्स्थळी निरीक्षण केले.

अशा रितीने सदर शोधप्रबंधासाठी गोळा करण्यात आलेल्या माहितीचे संकलन, वर्गीकरण व विश्लेषण करून निष्कर्ष काढले व शिफारशी सूचविल्या आणि पुढील संशोधनासाठी कांही विषयही सुचविले आहेत. त्याचे अहवालात्मक

लेखन विविध प्रकरणातून केले आहे.

१.८] प्रकरणीकरण -

संशोधनामध्ये वापरलेली पध्दती, तंत्रे, साधने याद्वारे संकलीत केलेल्या माहितीचे पृथक्करण आणि चिकित्सक परिक्षण करून अन्वयार्थ लावला, त्यासाठी आवश्यक ती सांख्यिकीय परिमाणे वापरली व निष्कर्ष काढले. त्या सर्वांचे पुढील प्रकरणामध्ये विभाजन करून अहवाल लेखन केले.

प्रकरण- एक : प्रास्ताविक

या प्रकरणामध्ये ही समस्या कशी निर्माण झाली ? त्यामागील पार्श्वभूमी कोणती ? यासंबंधी ऊहापोह केला असून समस्येचे शब्दांकन केले आहे. संशोधनाचे महत्व, उद्दिष्टे, व्याप्ती, मर्यादा स्पष्ट केल्या असून यासाठी वापरलेली संशोधन पध्दती व साधने कोणती उपयोजिली आहेत ते नमूद केले आहे. थोडक्यात हे प्रकरण वाचकाला संशोधन विषयाचा परिचय करून देणारे आहे.

प्रकरण- दोन : इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील मराठी विषयाचे अध्ययन-अध्यापन

सदर प्रकरणात संशोधनास आवश्यक असलेली सैध्दांतिक पार्श्वभूमी विशद केली आहे. यामध्ये इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील मराठी भाषेचे स्थान, महत्व, अध्यापनाची उद्दिष्टे, अध्यापनाच्या पध्दती, मराठीचा शिक्षक, शैक्षणिक साधने, पाठयपुस्तक, अभ्यासपूरक उपक्रम इ. बाबींचा विचार केलेला आहे.

प्रकरण- तीन : मिरज तालुक्यातील इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक शाळेतील मराठी विषयाच्या अध्ययनविषयक समस्या

या प्रकरणामध्ये मिरज तालुक्यातील इंग्रजी माध्यम असणा-या सर्व शाळेतील इयत्ता ९ वी व १० वीच्या विद्यार्थ्यांना मराठी विषयाच्या अध्ययनामध्ये कोणत्या समस्या येतात ते त्यांना दिलेल्या प्रश्नावलीच्या आधारे

मांडल्या आहेत. त्यासाठी विद्यार्थी प्रश्नावलीद्वारा मिळालेल्या माहितीचे पृथक्करण, विश्लेषण, सांख्यिकी, विश्लेषण करून समस्या मांडल्या आहेत.

प्रकरण- चार : <u>मिरज तालुक्यातील इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक शाळेतील मराठी विषयाच्या अध्यापनविषयक समस्या</u>

या प्रकरणातील विवेचनात मिरज तालुक्यातील सर्व शाळातील मराठी विषय शिकविणा-या शिक्षकांना प्रश्नावली व प्रत्यक्ष वैयक्तिक भेटी, मुलाखती, निरीक्षणे या साधनांद्वारे मिळालेल्या माहितीचे वर्गीकरण, पृथक्करण, विश्लेषण केलेले आहे.

विश्लेषण करून सांख्यिकिय कोष्टके तयार केली आहेत. या सर्व माहितीच्या आधारे अन्वयार्थ लावून अध्यापनविषयक समस्यांचा शोध घेतला आहे. या समस्या भाषेच्या गद्य, पद्य, व्याकरण व लेखन या सर्व घटकांच्या संदर्भातील आहेत.

प्रकरण- पाच : <u>निष्कर्ष व शिफारशी</u>

मागील प्रकरण तीन व चार च्या प्राप्त माहितीच्या लावलेल्या अन्वयार्थाच्या सहाय्याने निष्कर्ष काढलेले आहेत व त्या निष्कर्षाच्या आधारे योग्य शिफारशींचा निर्देश केलेला आहे व समस्या निराकरण करण्यासाठी उपाययोजना सूचविलेली आहे.

तसेच संशोधन करताना अगर पूर्ण झाल्यानंतर सदर संशोधनाशी संबंधित नसलेल्या संशोधिकेस जाणविलेल्या संशोधनात उपयुक्त ठरतील अशा कांही समस्यांचा निर्देश पुढील संशोधनासाठी केलेला आहे.

-****-

## संदर्भ सूची


१. अकोलकर, ग. वि., पाटणकर, ना. वि. : मराठीचे अध्यापन, [पुणे : व्हीनस प्रकाशन], १९९०, पृ. ४

२. कुंडले, म. बा. : मराठीचे अध्यापन, [पुणे : श्री विद्या प्रकाशन], तृतीय आवृत्ती, १९९१, पृ. २०

३. भगत, रा. तु., राणे, गो. य., माळी, आ. ल. : थोर शिक्षणतज्ञ, [पुणे : पुणे प्रकाशन], प्रथमावृत्ती, १९७८

४. शिरवाडकर, वि. वा. : जागतिक परिषद अध्यक्षीय भाषण, ऑगस्ट-१९८९, सकाळ

५. Misra, S.N. : A study of problems and difficulties of language teaching at secondary level, Ph.D., (Education) Sag. U. 1968, Abstract in M.B.Buch (Ed.) Third survey of Research in Education, NewDelhi, NCERT, 1987, Page 596.

६. भिंताडे, वि. रा. : शैक्षणिक संशोधन पध्दती, [पुणे : नूतन प्रकाशन] प्रथमावृत्ती, १९८९, पृ. १५

७. कित्ता, पृ. १६